International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 6 No. 18 March - April - 2025

# भारतीय उद्योजकांपुढील संधी व आव्हाने

**प्रा. डॉ. मनीषा देख क्षीरसागर**
*गृह अर्थशास्त्र,*
*स्व. राजकमलजी भारती कला वाणिज्य व श्रीमती सुशिलाबाई रा भारती विज्ञान महाविद्यालय आर्णी*
*Corresponding Author – प्रा. डॉ. मनीषा देख क्षीरसागर*
DOI - 10.5281/zenodo.15251035

**सारांश:**

*भारतात महिला उद्योजक पुढे येत आहेत. परंतु त्यांची संख्या आजही मोठी नाही. उद्योजकांना पुढे नेण्यासाठी ज्ञान व मार्गदर्शन तसेच प्रोत्साहन देण्याची गरज आहे. अनेक उद्योजक स्वकृत्ववाने यशस्वी झाल्या आहेत. विविध योजनातून सहकार्य घेऊन, आलेल्या संधीचा उपयोग करून, नवनवीन आव्हाने स्वीकारून नवीन क्षेत्रातील उद्योजक उद्योजिका प्रारंभ करू शकतात. घरगुती उद्योग व उद्योगांना लागणारे कच्चे साहित्य निर्मिती क्षेत्रात महिला उद्योजकांनी कार्य करावे. तसेच आहार व आरोग्य याकडे कटाक्षाने लक्ष द्यावे.*

**प्रस्तावना:**

राष्ट्राचा आर्थिक विकास कणखर बनविण्यासाठी मोठ्या प्रमाणावर उद्योजकांची आवश्यकता असते. राष्ट्रातील आर्थिक चळवळ बदल घडवून आणणाऱ्या व्यक्तीवरच अवलंबून असते. भारतासारख्या विकसनशील राष्ट्राचा विचार केला तर उद्योजकता विकासामुळे अनेक घडामोडीचा प्रारंभ होऊ शकतो. उपलब्ध साधनांचा मनुष्यबळासह पर्याप्त वापर होऊ शकतो.पर्यायाने राष्ट्राचा आर्थिक विकास होतो. मानवी समाजाने जी वाटचाल केली त्याहीपेक्षा कितीतरी पटीने जास्त प्रगती नजीकच्या काळात केली आहे.प्रत्येक राष्ट्र हे विकासाच्या दिशेने जाताना दिसत आहेत.आर्थिक विकासा,औद्योगिक विकासावर अवलंबून असतो.उद्योजकता ही नैसर्गिक देणगी आहे असा समज आहे.उद्योजकता जन्मजात गुण नसून उद्योजकतेची गुण कमी अधिक प्रमाणात असू शकतात. राष्ट्र विकसनशील असो वा अविकसित असो प्रत्येक राष्ट्राला उद्योजकता विकासाला यथायोग्य महत्त्व द्यावेच लागते. भारतासारख्या विकसनशील देशात सुद्धा याचे महत्त्व भरपूर प्रमाणात आहे विकसित राष्ट्रांना सुद्धा संपूर्ण जगभर चाललेल्या तीव्र स्पर्धेला तोंड द्यावे लागत आहे.

**व्याख्या:**

1) अल्बर्ट शिप्रो यांच्या मते," उद्योजक म्हणजे जो पुढाकार घेतो सामाजिक आर्थिक स्वरूपाचे कार्य करतो तसेच यश आणि अपयश दोन्हीचा स्वीकार करण्याची तयारी दर्शवितो."
2) उद्योजकता म्हणजे मनोबल, नवीन कल्पना, आत्मविश्वास काम करण्याची धडपड अशा कितीतरी गोष्टी सांगता येतील समाजाच्या प्रगतीसाठी उन्नतीसाठी कल्याणासाठी जे पाऊल टाकले जाते ते म्हणजे उद्योजकता होय.

**उद्देश:**

1) उद्योगाच्या माहितीचा अभाव
2) उद्योजकांमध्ये स्पर्धा आणि आव्हानांना तोंड देण्याची क्षमता असते.
3) उद्योजक ध्येय निश्चित असतात.

**साहित्य अवलोकन:**

1) उद्योजक हा एक संघटक असतो यामध्ये उद्योजकतेच्या अंगावर प्रकाश टाकला. उत्पादनासाठी लागणारी साधनसामग्री एकत्रित करणे आणि धोका पत्करणे या जबाबदाऱ्या उद्योजकांवर असतात.
2) अमेरिकेतील एक मानसशास्त्रज्ञ डी.सी मॅक्सिलेंड यांनी, संशोधन करून असा निष्कर्ष काढला की,कोणत्याही राष्ट्राची औद्योगिक करण्याची गती, नैसर्गिक संपत्ती,पायाभूत सोयी,तंत्रज्ञान, व्यवस्थापनाचे ज्ञान किंवा भांडवलावर नसून त्या राष्ट्रातील जनतेच्या उद्योजकतेवर व अंतप्रेरित असा उद्योजक नैसर्गिक व इतर साधन संपत्तीचा उपयोग करून औद्योगीकरणाची गती वाढवू शकतो.

**उद्योजकता बद्दल माहिती:**

**1) उद्योजिका घडविणाऱ्या अलकाताई:**

उद्योग हा मग लघुउद्योग असो किंवा कारखाना असो वा सेवा व्यवसाय असो त्यांचे यश उत्तम व्यवस्थापनात असते.मॅनेजमेंट गुरु पीटर अमेरिकेत एका भाषणात म्हणाले की, आदर्श व्यवस्थापक कोणाला म्हणावे तर ते भारतीय गृहिणी असा उल्लेख करून भारतीय गृहिणीचा एका प्रकारे गौरव केला.जवळजवळ सर्वच महिलांना घरातील कामाव्यतिरिक्त काहीतरी वेगळे करून निर्मितीचा आनंद घ्यावा.दुसऱ्यांना स्वतःची ओळख करून द्यावी पण हे कसे असा प्रश्न पडतो आणि त्यामुळे महिला उद्योग व्यवसायाकडे वळत नाहीत परंतु अशा महिलांच्या आत्मविश्वासाचे बीज रुजविण्यासाठी ठाण्याच्या अलकाबांधेकर यांनी पुढाकार घेऊन ठाण्यात दहा वर्षांपूर्वी लेडीज नेटवर्क वेल्फेअर असोसिएशनची स्थापना केली आणि या असोसिएशन द्वारे उद्योजिका घडविण्याचे मुलाचे कार्य अलका बांदेकर करिता आहेत. भरतकाम, वारली पेंटिंग,जर दोषी वर्क मनी,मोती,आरसे,शिंपले फाइल्स व कापडावर त्यांच्या उपयोग करतात.

**2) गृह व्यवस्थापन व गृहकला:**

गृह अंतर्गत रचना आणि गृह सजावट यात शास्त्रीय ज्ञान दिले जाते. गृह अर्थशास्त्र अंतर्गत रचना,गृह सजावट, फर्निचर मांडणी, विविध वस्तूंची मांडणी याविषयीची माहिती सविस्तर दिली जाते.

**3) पुष्प सजावट करणे:**

समारंभाच्या ठिकाणी तसेच ऑफिसमध्ये घरामध्ये वेगवेगळ्या प्रकारच्या पुष्परचना करून त्यामुळे व्यवसाय म्हणून पुष्परचना हे क्षेत्र चांगले उत्पन्न प्राप्त करण्यास योग्य ठरते.

**4) ग्राहक सल्ला केंद्र:**

यामध्ये ग्राहक कल्याण ग्राहकयोगी सेवा ग्राहक संरक्षण कायदे यांचे ज्ञान घेऊन ग्राहकाला जागृत करण्याकरिता ग्राहकांची सल्ला केंद्रित काढणे हा एक स्वयंरोजगार होऊ शकतो.

**5) अन्न उद्योग:**

आहाराच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा योग्य आहार घेतल्यास आरोग्य चांगले राहण्यास मदत होते. आहार व पोषण या विषयाच्या अभ्यासाद्वारे उद्योजकांमध्ये संधी प्राप्त होण्यास मदत होते.

**6) खाद्यपदार्थ तयार करून स्वयंरोजगार:**

आज गृहिणीचे जीवन धावपळीचे झाल्यामुळे गृहिणी नोकरी व घरकाम या दोन्ही क्षेत्रात काम करीत असते. गृहिणीला विशिष्ट पदार्थाचे कौशल्य असेल तर ते पदार्थ तयार करून ग्राहकांपर्यंत पोहोचू शकते आणि अर्थार्जण प्राप्त करू शकते.त्यामध्ये दीर्घकाळ टिकणाऱ्या पदार्थापासून ती स्वयंरोजगार प्राप्त करू शकते तसेच डबाबंद पदार्थ तयार करून त्यातून ती स्वयंरोजगार प्राप्त करू शकते.

**7) आहार तज्ञ:**

आधुनिक काळात लोकांना आहार तज्ञाचे महत्त्व पटले आहे खाजगी, सरकारी दवाखान्यात आरोग्य केंद्र येथे आहारतज्ञ म्हणून काम करू शकतात. आहार तज्ञाला आहार आणि गरजेनुसार आहाराचे आयोजन याकरिता आहार तज्ञाचीच गरज असते.

**8) वस्त्रोद्योगातून विविध संधी:**

आजकाल या गोष्टींना फार महत्त्व आहे.कपड्यावरून संस्कृती व सामाजिक प्रतिष्ठा यांचे अनुमान काढता येते नाविन्यपूर्ण कपड्यांमुळे व्यक्तिमत्त्वात भर सुद्धा पडते या बदललेल्या दृष्टिकोनामुळे वस्त्र शास्त्रात स्वयंरोजगाराच्या विविध संधी निर्माण होऊ शकतात.

**9) भरत कामाच्या माध्यमातून विविध संधी:**

प्रांता प्रांतात असलेले भरत कलेच्या टाक्याचा उपयोग केला जातो. याचा व्यवसाय म्हणून उपयोग करता येतो जसे साडीवरचे भरतकाम,जरी भरून देणे, लहान मुलांच्या कपड्यावर शोपीस तयार करणे करून आर्थिक सहाय्य प्राप्त करता येते.

**10) बालविकास व कौटुंबिक संबंध यातून स्वयंरोजगाराची संधी:**

स्त्रिया नोकरी करीत असल्यामुळे मुलांना सांभाळण्याचा प्रश्न उद्भवतो याकरिता विवाह आणि कौटुंबिक सल्ला केंद्र चालवणे अशा प्रकारचे काम करता येते.पाळणाघर चालविणे, बालवाडी सुरू करणे, बालकांच्या समस्या सोडविण्यासाठी सल्ला केंद्रे स्थापन करणे, विवाह आणि कौटुंबिक संबंध सल्ला केंद्र स्थापन करणे इत्यादी व्यवसाय करू शकतात.

**11) गृहविज्ञान विस्तार आणि स्वयंरोजगार:**

विस्तार शिक्षणाच्या माध्यमातून माहिती ग्रामीण लोकांपर्यंत पोहोचविणे हे महत्त्वाचे काम आहे. शिबिर कार्यशाळा प्रदर्शनी याद्वारे लोकांमध्ये जाणीव व जागृती करणे, खेड्यातील समस्या सोडविण्याचा प्रयत्न करणे याकरिता बेरोजगार म्हणून मानधन तत्वावर समस्या सोडवण्यासाठी किंवा प्रगतीसाठी काम करणे अशा प्रकारच्या छोट्या छोट्या व्यवसायातून आर्थिक उत्पन्न प्राप्त करता येते.

**12) महिला उद्योजकांसाठी शासनाचे विशेष धोरण:**

आजच्या आधुनिक व गतिमान युगात शाश्वत्व सामाजिक विकासाच्या जागतिक वाटचालीमध्ये महिला उद्योजकांची महत्त्वाची भूमिका आहे परंतु भूमिका जरी मोलाची असले तरी त्यांच्या उद्योजकीय कार्यक्षमतेला पुरेसा वाव मिळाला नाही. सध्याच्या स्थितीत महिला उद्योजकांपुढे लिंगभेद व समाजातील स्थान व्यवसाय सुरू करण्याकरिता अपुरे स्त्रोत,तांत्रिक व तांत्रिक व व्यावसायिक ध्यानाचा अभाव अशी अनेक आव्हाने असतात महिला उद्योजकांच्या वाढीसाठी राज्यात आश्वासक व्यावसायिक वातावरण निर्माण करणे व तांत्रिक परिचयनात्मक तसेच आर्थिक सहाय्य पुरवून राज्यातील महिलांना सक्षम बनविणे हा यामागील उद्देश ठरू शकतो.

**निष्कर्ष:**

आधुनिक तंत्रज्ञानाबरोबर उद्योजकता हा घटक या पूरक वातावरणाला जबाबदार आहे उद्योजक म्हणजे माणसातील नवनिर्मितीची उभारी अथक प्रयत्नाने इतरांची मदत घेऊन नवे मार्ग शोधतात निसर्ग संपदा पैसा कामगार असे सगळे घटक संघटित करून त्या सर्व गोष्टी एकत्र आणून एखाद्या नव्या उत्पादनाच्या कल्पनेसाठी त्यांना गुंतवणे त्यांची कुशल पणे कार्यवाही करणे हे महत्त्वाचे आहे. म्हणून आर्थिक विकासाच्या दृष्टिकोनातून विचार केल्यास उद्योजकता यांचे स्थान अतिशय महत्त्वाचे आहे.

**संदर्भ :**

1) उद्योजकता आणि विकास - डॉ. किशोर वंगळ
2) महाराष्ट्रातील महिला उद्योजक- डॉ. शैलजा सांगळे
3) व्यावसायिक उद्योजकता - प्रा. डॉ. रवींद्र कोठावदे
4) सामुदायिक विकास विस्तार शिक्षण व महिला सबलीकरण - डॉ. उज्वला वैरागडे
5) व्यावसायिक पर्यावरण आणि उद्योजकता विकास- डॉ. माधुरी लेले